# प्रेसनोट

जा.क्र.-पोउप-आ/वाहतूक/ ९१९५ /२०१८ पुणे शहर, दिनांक- ०५.०९.२०१८.

**विषय :- वाहतूक पोलीसांच्या उल्लेखनिय कामगिरीबाबत.**

----------------oo----------------

वाहतूक शाखा, पुणे शहर कडील पोलीसांनी वाहतुक नियमनाचे दैनंदिन कर्तव्य पार पाडत असतानाच खालीलप्रमाणे उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

दिनांक- ०४/०९/२०१८ रोजी, सायं. १८.४५ वा. चे सुमारास खडकी वाहतुक विभागामध्ये बोपोडी चौक ते होळकर ब्रीज या रोडवर वाहतुकीचे नियमभंग करणा-या वाहनचालकांवर कारवाई करण्याकरीता विशेष मोहीम राबविण्यात आली होती त्यावेळी खडकी गणपती मंदीरासमोरून एक इसम त्याचे होंडा ॲक्टीव्हा दुचाकीवरुन मोबाईलवर बोलत गाडी चालवित असताना त्यास पोलीस कर्मचारी यांनी थांबण्याचा इशारा केला असता,तो तेथे न थांबता पळून जाऊ लागला त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.जितेंद्र कोळी यांनी कर्मचारी लेंडवे यांना सदर इसमास पकडण्याचे सांगतिले असता, कर्मचारी यांनी त्यास पळत जाऊन जागीच पकडले.त्यावेळी सदर इसम हा दारु पिऊन वाहन चालवित होता,त्यास ताब्यात घेतले असताना तेथे चतुश्रृंगी पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी आले व त्यांनी सदरचा इसम नामे- शुभम बापू सपकाळ,वय २० वर्ष रा. एलफिन्टनरोड खडकी पुणे याने चतुश्रृंगी पोलीस ठाणेचे हद्दीत जबरी चोरी केली असल्याचे सांगितले. सदर आरोपी इसमाने दारु पिऊन वाहन चालविले बाबत कारवाई करुन त्यास चतुश्रृंगी पोलीस ठाणे यांना गुन्ह्याचे कामी ताब्यात दिले सदर आरोपीत इसमास चतुश्रृंगी पोलीस ठाणे गु.रजि.नं. ३९८/२०१८ कलम- ३९२,३४ मध्ये अटक होऊन सदर आरोपींकडून ३४५००/- रु. चोरीचा माल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई ही खडकी वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक- श्री जितेंद्र कोळी, पोलीस नाईक लेंडवे, आदेश कदम, अश्विन मदने, सिध्देश्वर वाघोले, स्वप्निल शिंदे यांनी केली असून त्यांचे कर्तव्य दक्षतेमुळे जबरी चोरीचा गुन्हा उघड झाला असून त्यांनी आरोपीताना पकडून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याबाबत पोलीस उप आयुक्त,वाहतुक तेजस्वी सातपुते यांनी विशेष कौतुक केले आहे.

| | |
|---|---|
| | जा.क्र./पोउआ/वाह/७१९५ /२०१८ |
| **प्रेसनोट** | पुणे, दिनांक - ०५ / ०९ /२०१८ |

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी तेजस्वी सातपुते, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, यापुर्वी या ठिकाणी काही पार्कींग निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - ०५/०९/२०१८ ते दिनांक - १९/०९/२०१८ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**बंडगार्डन वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

**कर्नल तारापोर रोडवर हॉटेल ब्ल्यु नाईल चौक ते किराड चौक दरम्यान न्युक्लियस मॉलच्या बाहेर रस्त्याचे दक्षिण बाजुस व हॉटेल ब्ल्यु नाईल ते कौन्सिल हॉल चौक दरम्यानच्या रस्त्याचे पश्चिम बाजुस वाहनांसाठी नो-पार्किंग करणेत येत आहे.**

जा.क्र./पोउआ/वाह/ ६१ ९६/१८

**प्रेसनोट** पुणे दिनांक - ०५/०९/२०१८

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी तेजस्वी सातपुते, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, बाजीराव रोड, टिळक रोड, शिवाजी रोड, कुमठेकर रोड, लक्ष्मी रोड या रस्त्यांवर मालाची चढ-उतार करण्यास प्रायोगिक तत्वावर सकाळी ०७.०० ते रात्री २२.०० वा. पर्यंतचे कालावधीमध्ये मनाई आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. ( या रस्त्यांवर पुर्वीचे अवजड वाहने (लक्झरी बससह) व अन्य वाहने यांचेसाठी असलेले निर्बंध कायम राहुन हे अतिरीक्त निर्बंध असतील.)

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - ०५/०९/२०१८ ते दिनांक – १९/०९/२०१८ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचन व हरकती विचार करुन अंतिम आदेश काढण्यात येतील.

**पुणे शहरातील बाजीराव रोड, टिळक रोड, शिवाजी रोड, कुमठेकर रोड, लक्ष्मी रोड या रस्त्यांवर वाहने थांबवुन मालाची चढ-उतार करण्यास प्रायोगिक तत्वावर सकाळी ०७.०० ते रात्री २२.०० वा. पर्यंतचे कालावधीमध्ये मनाई आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**